# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/ ३५० /2025-26** **दि. २५ / ०५ /2025**

विषय :- २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन म्हणून साजरा करणेबाबत.

**आदेश**

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. GAD/94/2024-Lokshahidin, दि.01 एप्रिल, 2025 अन्वये राज्यात 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच दि. 28 एप्रिल, 2025 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत आहेत. या दोन्ही बाबींचे औचित्य साधून राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दि.28/08/2025 रोजी सर्व महानगरपालिका व नगर परिषद कार्यालयांमध्ये "सेवा हक्क दिन साजरा करण्याकामी विशेष सभा आयोजित करण्याबावत तसेच संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी करणेबाबत राज्य मुख्य संचा हक्क आयुक्तांनी दि.09/04/2025 रोजीच्या पत्राद्वारे सुचना दिल्या आहेत.

त्यादृष्टीने सर्व महानगरपालिका/नगरपरिषद यांचे कार्यक्षेत्रात नागरिकांमध्ये उक्त अधिनियमावावत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी दि.28/04/2025 रोजी "सेवा हक्क दिन" साजरा करून त्या निमित्ताने नागरी भागात खालील विविध कार्यक्रम आयोजित करणेबाबत दि.23/04/2025 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने कार्यक्रमाची रुपरेषा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यक्रम | अंमलबजावणी विभाग |
|---|---|---|
| 1. | सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे. | 1. श्री.प्रकाश बोराडे, अग्निशमन केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग<br>2. डॉ.प्रमोद पडवळ, माता व बाल कल्याण अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग<br>3. सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06<br>4. श्री.पुरुषोत्तम शिंदे, सहा.संचालक नगररचना, नगररचना विभाग<br>**मुख्य कार्यालय**<br>5. श्री.दिपक खांबीत, प्र.अतिरिक्त शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>6. श्री.शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग<br>7. श्री.चंद्रकांत बोरसे, सहा.आयुक्त, कर विभाग<br>8. डॉ.प्रमोद पडवळ, निबंधक, जन्म-मृत्यु विभाग |

| अ.क्र. | कार्यक्रम | अंमलबजावणी विभाग |
|---|---|---|
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी सेवादूत योजना सुरू करणे. | श्री.सुनिल यादव, सहा.आयुक्त (आस्थापना) |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयामंध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE विकसीत करणे, SMS पाठविणे | श्री.राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर, माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| 4. | मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयांमध्ये लोकसेवा हक्क संदर्भात ऑनलाईन पध्दतीने पुरविण्यात येणाऱ्या 65 सेवांचे बोर्ड लावणे. | 1. श्री.प्रकाश बोराडे, अग्निशमन केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग<br>2. सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06<br>3. श्री.पुरुषोत्तम शिंदे, सहा.संचालक नगररचना, नगररचना विभाग<br>**मुख्य कार्यालय**<br>4. श्री.दिपक खांबीत, प्र.अतिरिक्त शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>5. श्री.शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग<br>6. श्री.चंद्रकांत बोरसे, सहा.आयुक्त, कर विभाग<br>7. डॉ.प्रमोद पडवळ, माता व बाल कल्याण अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग<br>8. डॉ.प्रमोद पडवळ, निबंधक, जन्म-मृत्यु विभाग |
| 5. | शाळांमध्ये जनजागृती करणे. | श्रीम.दिपाली पोवार, सहा.आयुक्त शिक्षण विभाग |
| 6. | प्रसार माध्यमांमध्ये प्रसिध्दी करणे | श्री.जितेंद्र कांबळे, कार्यालय अधीक्षक, जनसंपर्क विभाग |
| 7. | स्काऊट गाईड यांचेसमोर महाराष्ट्र लोकसेवा हक्क (RTS) जनजागृती करणे | श्रीम.दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| 8. | महिलांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क (RTS) जनजागृती करणे | डॉ.अंजली पाटील, वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग |

सबब वरील तक्त्यात संबंधीत विभागाने कार्यक्रम पार पाडणेकरीता नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करावयाचे असून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.29/04/2025 रोजी आस्थापना विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागात सादर करण्यात यावा.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका